महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १०९ वे | दिनांक : १४/०४/२०२६ | वार : मंगळवार

## प्रतिभा चाकणकरांची ८ तास चौकशी; 'समता'मधील कोट्यवधींचे व्यवहार अन् सह्या बनावट असल्याचा दावा



**शिर्डी :** नाशिकच्या गाजलेल्या भोंदू अशोक खरात प्रकरणाचा तपास आता थेट राजकीय वर्तुळातील नातेसंबंधांपर्यंत पोहोचला असून, या प्रकरणातील चौकशीचा फास अधिक घट्ट होताना दिसत आहे. राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्या भगिनी प्रतिभा चाकणकर यांची सोमवारी शिर्डी पोलिस ठाण्यात तब्बल 8 तास चौकशी करण्यात आली. समता पतसंस्थेतील कोट्यवधींच्या संशयास्पद व्यवहाराप्रकरणी ही चौकशी करण्यात आली. या चौकशीदरम्यान प्रतिभा चाकणकर यांनी धक्कादायक खुलासा करत, पतसंस्थेतील ती खाती बनावट असून सर्व सह्या खोट्या असल्याचा दावा केला आहे.

समता पतसंस्थेत प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या नावे एकूण चार खाती असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. यात प्रतिभा यांच्या नावे दोन आणि त्यांचा मुलगा चिन्मय याच्या नावे दोन खाती आहेत. विशेष म्हणजे, या खात्यांमधून आतापर्यंत सुमारे 2 कोटी 40 लाख रुपयांची मोठी उलाढाल झाली आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या सर्व खात्यांवर वारसदार (नॉमिनी) म्हणून मुख्य आरोपी अशोक खरात याचे नाव नोंदवण्यात आले आहे. याच संशयास्पद व्यवहारांचा धागा पकडून पोलिसांनी चाकणकर माय-लेकांचा जबाब नोंदवला.

चौकशीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना प्रतिभा चाकणकर यांनी आपली बाजू स्पष्ट केली. त्या म्हणाल्या, "संबंधित खाती मी उघडलेली नाहीत, तसेच त्यावर असलेल्या माझ्या सह्या खोट्या आहेत. या खात्यांमधून आम्ही एक रुपयाचाही व्यवहार केलेला नाही. देवदर्शनाच्या बहाण्याने अशोक खरातने आमची कागदपत्रे घेतली होती आणि व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवलेल्या त्याच कागदपत्रांचा गैरवापर करून ही बनावट खाती उघडली असावीत, असा दावा प्रतिभा चाकणकर यांनी केला.

दरम्यान, आपल्याला कोणतीही अधिकृत नोटीस मिळाली नव्हती, तरीही बातम्या पाहून आपण स्वतःहून जबाब देण्यासाठी पोलिसांसमोर हजर झालो, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

प्रतिभा चाकणकर यांच्या वकील जयश्री काळे-पालवे यांनी या प्रकरणातील तांत्रिक त्रुटींवर बोट ठेवले. "प्रतिभा चाकणकर आणि त्यांच्या मुलाच्या नावाने समता पतसंस्थेत बनावट खाती उघडण्यात आली आहेत. त्या कधीही या पतसंस्थेत गेल्या नाहीत. खाते उघडताना अर्जावर चुकीचा पत्ता वापरण्यात आला आहे. आम्ही पोलिसांना सह्यांचे नमुने दिले असून, पुढील तपासात पोलिसांना पूर्ण सहकार्य केले जाईल," असे त्यांनी सांगितले.

शिर्डी पोलिसांकडून आता या प्रकरणाचा सखोल तपास सुरू आहे. बनावट खाती उघडण्यासाठी पतसंस्थेच्या नियमांचे उल्लंघन झाले का? या कोट्यवधींच्या व्यवहारांचा मूळ स्रोत काय आहे? आणि यामागे कोणते मोठे नेटवर्क कार्यरत आहे? याचा शोध पोलिस घेत आहेत. या प्रकरणातील धागेदोरे मोठे असण्याची शक्यता असून येत्या काळात आणखी काही धक्कादायक खुलासे होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## यंदा 'सरासरीपेक्षा कमी' पावसाची शक्यता : भारतीय हवामान विभाग



**मुंबई :** देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांसह संपूर्ण अर्थव्यवस्थेचे लक्ष लागून राहिलेल्या नैऋत्य मान्सून 2026 चा पहिला अधिकृत अंदाज भारतीय हवामान विभागाने आज जाहीर केला आहे. यावर्षी देशात सरासरीच्या 92 टक्के पाऊस पडण्याचा अंदाज वर्तवण्यात आला असून, हे प्रमाण 'सामान्य पेक्षा कमी' या श्रेणीत येते. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव डॉ. एम. रविचंद्रन आणि हवामान विभागाचे महासंचालक डॉ. एम. मोहापात्रा यांनी नवी दिल्लीत आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

यंदाच्या मान्सूनवर 'एल निनो' (El Niño) या हवामान स्थितीचे सावट राहण्याची शक्यता आहे. डॉ. मोहापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार, जुलै ते सप्टेंबर या काळात 'एल निनो'ची परिस्थिती निर्माण होऊ शकते, ज्यामुळे पावसाचे प्रमाण कमी होण्याची भीती असते. दिलासादायक बाब म्हणजे, याच काळात हिंदी महासागरात 'इंडियन ओशन डायपोल' (IOD) सकारात्मक राहण्याची शक्यता आहे. हा सकारात्मक आयओडी 'एल निनो'च्या नकारात्मक प्रभावाला रोखण्यास मदत करतो, त्यामुळे पावसाची तूट काही प्रमाणात भरून निघू शकते. जून ते ऑगस्ट दरम्यान पावसाची स्थिती सुरुवातीला सामान्य राहण्याची अपेक्षा आहे.

भारतीय हवामान विभागाने पाऊस मोजण्यासाठी पाच प्रमुख स्तर निश्चित केले आहेत:

१.अपुरा पाऊस: सरासरीच्या 90 टक्क्यांपेक्षा कमी.

२.सरासरीपेक्षा कमी: 90 ते 95 टक्के (यंदाचा अंदाज याच श्रेणीत आहे).

३.सामान्य पाऊस: 96 ते 104 टक्के.

४.सरासरीपेक्षा अधिक: 105 ते 110 टक्के.

५.सर्वाधिक पाऊस: 110 टक्क्यांच्या पुढे.

बळीराजा आणि अर्थव्यवस्थेवर काय परिणाम?

खाजगी हवामान संस्थांनी यापूर्वीच मान्सून कमकुवत राहण्याचे संकेत दिले होते, त्यावर आता सरकारी मोहोर उमटली आहे. पावसाचे प्रमाण 92 टक्के राहिल्यास शेतीकामांचे नियोजन, पेरण्या आणि पाणीसाठ्यावर त्याचा परिणाम होऊ शकतो. भारतीय अर्थव्यवस्था प्रामुख्याने मान्सूनवर अवलंबून असल्याने, हा अंदाज धोरणकर्त्यांसाठी आणि शेतकऱ्यांसाठी धोक्याची घंटा मानला जात आहे.

"पावसाचे प्रमाण कमी असले तरी त्याचे वितरण (Distribution) कसे राहते, हे महत्त्वाचे आहे. जूनमध्ये मान्सूनचे आगमन आणि त्याची वाटचाल कशी होते, यावर खरीप हंगामाचे भवितव्य अवलंबून असेल," असे मत कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. तसेच अखेरच्या टप्प्यात पावसाचे वितरण कसे राहते, यावर बरेच काही अवलंबून असेल. हवामान विभाग मे महिन्याच्या अखेरीस मान्सूनचा दुसरा सुधारित अंदाज जाहीर करेल, ज्यामध्ये प्रादेशिक पातळीवरील पावसाच्या वितरणाची अधिक स्पष्ट माहिती मिळेल.

## खासदार श्रीकांत शिंदेंचा ग्रामीण दौरा सुरू : छत्रपती संभाजीनगरमध्ये ३०० पदाधिकाऱ्यांशी साधला संवाद



**छत्रपती संभाजीनगर :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानंतर शिवसेना नेत्यांनी पक्ष विस्ताराला प्राधान्य दिले आहे. याचाच एक भाग म्हणून शिवसेना संसदीय पक्षाचे नेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा ग्रामीण महाराष्ट्राचा दौरा रविवारपासून सुरू झाला आहे. पहिल्या टप्प्यात खासदार डॉ. शिंदे यांनी आज छत्रपती संभाजीनगरमध्ये जालना आणि छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघांची आढावा बैठक घेतली.

या बैठकीत त्यांनी जिल्ह्यातील सुमारे ३०० पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी मंत्री तथा पालकमंत्री संजय शिरसाट, मंत्री गुलाबराव पाटील, मंत्री उदय सामंत, खासदार संदिपान भुमरे, आमदार अब्दुल सत्तार, हिकमत उढाण, संजना जाधव, रमेश बोरनारे, विलास भुमारे, प्रदीप जैस्वाल, संपर्क प्रमुख विलास पारकर, जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ, प्रकाश महाजन आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार डॉ. शिंदे यांनी सांगितले की, छत्रपती संभाजीनगर आणि जालना लोकसभा मतदारसंघांची आढावा बैठक घेण्यात आली. स्थानिक पातळीवर पक्ष संघटना कशा पद्धतीने काम करत आहे, याचा आढावा घेण्यात आला. शेवटच्या स्तरावरील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेण्यात आल्या.

शिवसेना राज्यात आणि केंद्रात सत्तेत असल्याने, पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी लोकांचे प्रश्न सोडवण्याला प्राधान्य द्यावे, असे निर्देश खासदार डॉ. शिंदे यांनी दिले. शिवसेना मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेले निर्णय जनतेपर्यंत पोहोचवावेत आणि महायुती सरकारच्या योजनांची माहिती लोकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहनही त्यांनी केले.

भविष्यात पक्षाकडून वारंवार बैठका घेतल्या जातील, असेही ते म्हणाले. लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, नगर परिषदा आणि पंचायत समितींमध्ये शिवसेनेचे उमेदवार विजयी झाले आहेत. त्यांच्या माध्यमातून पक्ष विस्तारासाठी काम करण्याचे निर्देश पदाधिकाऱ्यांना देण्यात आले. ज्या ठिकाणी शिवसेनेच्या उमेदवारांचा पराभव झाला, तिथली कारणे शोधून कामात सुधारणा करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यापूर्वी खासदार डॉ. शिंदे यांनी ठाणे जिल्ह्यातील कल्याण, भिवंडी आणि ठाणे लोकसभा मतदारसंघांचा तसेच मुंबईतील सर्व सहा मतदारसंघांचा आढावा घेतला होता.

दरम्यान, बैठकीपूर्वी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे आणि उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांनी दोन मिनिटे मौन पाळून ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ एप्रिल २०२६


## माधवराव पाटील महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विद्यार्थ्यांकडून ग्रंथांचे उस्फुर्त वाचन करून सामाजिक समता दिन साजरा...



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** यंदाचे वर्ष हे महाड चवदार तळे सत्याग्रह शताब्दी वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाकडून दि. ८ ते १४ एप्रिल या सप्ताह कालावधीत संपूर्ण राज्यभरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता कार्यक्रमानिमित्ताने वाचन उपक्रम शनिवारी (ता.११) रोजी आयोजित करण्यात आला होता. या वाचन उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार होते. यावेळी ग्रंथपाल डॉ. राजकुमार देवशेट्टे, डॉ. सायबण्णा घोडके, डॉ. रविंद्र गायकवाड, डॉ. महेश मोटे, डॉ. सुधीर पंचगल्ले, प्रा. राजकुमार रोहीकर, डॉ. अविनाश मुळे, डॉ. राजेंद्र गणापुरे, प्रकाश रोडगे आदींची विशेष उपस्थिती होती. प्रारंभी महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पद्मश्री डॉ. रंगनाथन यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी, या उद्देशाने ग्रंथालयात विविध ग्रंथांचे वाचन उपक्रमांतर्गत दिवसभर ग्रंथालय खुले ठेवून वाचन दिन उस्फूर्तपणे साजरा करण्यात आला. डॉ. नागोराव बोईनवाड, दत्तू गडवे, नितीन कंटेकुरे, विजयालक्ष्मी भालेराव आदींनी पुढाकार घेतला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. गोपाळ कुलकर्णी तर आभार डॉ. मुकुंद धुळेकर यांनी मानले. यावेळी विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.





दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |





## साक्षरतेने सधन कन्नड तालुक्यात एसआयआर प्रभावी राबवा - महामंत्री सुनिल राणे




**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड विधानसभा ची आश्चयजनक गोष्ट म्हणजे दुर्गम भागात असून ही येथे साक्षरता ८६ टक्के आहेत. त्यामुळे एस आय आर प्रकल्प प्रभाविपणे राबविण्याचे अवाहन भाजप प्रदेश महामंत्री सुनिल राणे यांनी केले आहे. ते भाजप कन्नड वतीने दि. १३ एप्रिल रोजी एस आय आर अंतर्गत बिएलए -२ कार्यशाळा प्रसंगी बोलत होतै.ते पुढे म्हणाले की, सध्याचा काळ हा पक्षासाठी सुवर्णकाळ असा आहे.यासाठी भाजप कार्यकर्त्यांच्या अनेक पिढ्यांनी संघर्ष केला. मराठवाड्यातील कम्यूनिस्टांच्या सत्ता काळात जनसंघाचे कार्यकर्ते मेणबत्ती वरती काम करित होते. त्याचे आजचे हे फलित आहे. एस आय आर च्या या मोहिमे मुळे, बोगस मतदारांना आळा बसणार आहेत. तसेच देशातील खर्या नागरिकांना योजनांचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे हा केवळ मतदार शोधनाचा कार्यक्रम नसून देशाच्या विकासाचा महत्त्वा टप्पा आहे.प्रास्ताविकात जिल्हाध्यक्ष संजय खंबायते यांनी सांगितले की, तालुक्यात पक्षाने २८४ बिएलए दिले आहेत. त्या माध्यमातून मतदार नोंदणी व परिक्षण बारकाईने करण्यात येत आहे. तालुक्यात पक्ष मजबूत स्थितीत असून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. यावेळी बबनराव बनसोड व विविध पक्षातील कार्यकर्ते, सरपंचांनी भाजपा मध्ये प्रवेश केला. याप्रसंगी जि.प. सदस्य संजय गव्हाणे,किशोर पवार, जिल्हा सरचिटणीस सुभाष काळे, भरत राजपूत, मंजुषा मलदुडे, डॉ. दिलीपसिंग राजपूत, साहेबराव गवळी, मंडल अध्यक्ष सुनिल पवार, ललित सुरासे, श्री राम जंजाळ, सुनील जाधव,सुधाकर देवकर, प्रशांत आग्रवाल, अजबसिंग राजपूत, कल्याण जंजाळ, किशोर दिवेकर, काकासाहेब तायडे, सुनिल जाधव, अनिता पवार, धनराज बेडवाल, सुदाम पवार आदींसह पदाधिकारी, बुथ, शक्ती केंद्र प्रमुख, बिएलए, कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ एप्रिल २०२६







## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भरगच्च कार्यक्रमाची मेजवानी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सार्वजनिक जयंती उत्सव समितीतर्फे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ११ एप्रिल ते १४ एप्रिल दरम्यान विविध सांस्कृतिक व व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. दिनांक ११ एप्रिल रोजी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भीम गीत कव्वाल गायक रुक्मान ताज आणि संच अकोला यांचा भीम गीताचा जल्लोष कार्यक्रम या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून माजी आमदार विजयराव भांबळे तर उद्घाटक म्हणून सुरेश भैया नागरे यांची उपस्थिती असून स्वागताध्यक्ष रामराव उबाळे लक्ष्मणराव बुधवंत,केशवराव बुधवंत, हे राहणार आहेत. तर १२ एप्रिल रोजी आंबेडकर सांस्कृतिक चळवतील युवा गायिका निकिता बंड आणि टीम स्वरांजली यांचा भीम गीताचा समाज प्रबोधन पर दणदणीत कार्यक्रम होणारा असून या कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबाजानी खा साब तर उद्घाटक म्हणून सिद्धार्थ हत्तीहंबीरे तर स्वागताध्यक्ष शेख इस्माईल सलीम पैलवान,नागसेन भेरजे यांची उपस्थिती राहणार आहे.१३ एप्रिल रोजी राष्ट्रीय प्रबोधनकार व महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गायक विशाल कुमार आणि संच मुंबई यांचा समाज प्रबोधन पर भीम गीताचा बहादार कार्यक्रम असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षा पालकमंत्री मेघना बोर्डीकर तर उद्घाटक म्हणून जिल्हा परिषद अध्यक्षा लता विजयकुमार वाकळे सह सभापती गंगाधर बोर्डीकर, नगराध्यक्ष प्रताप भैया देशमुख तर स्वागत अध्यक्ष म्हणून सुरेश भुमरे,सचिन गोरे गोविंद थिटे, यांची उपस्थिती लाभणार आहे. वरील सर्व सांस्कृतिक कार्यक्रम सायंकाळी आयोजित केले आहे. तर १४ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता सुप्रसिद्ध व्याख्याते प्राध्यापक डॉ. प्रवीण कनकुटे यांचे आजचे लोकशाही व अनुयायांची जबाबदारी या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित केले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आनंदराव जाधव तर कार्यक्रमाचे उद्घाटक आनंदराव भरोसे स्वागता अध्यक्ष म्हणून गणेश काजळे पाटील व माजी आमदार हरिभाऊ लहाने काका यांचे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती तहसीलदार शितल कच्छवे, शासकीय तंत्रनिकेतन प्राचार्य गिरीश कानडे,पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे, मुख्याधिकारी उमेश ढाकणे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आबासाहेब जाधव, वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय मस्के,गट शिक्षणाधिकारी पोले, आदींची उपस्थित राहणार आहेत. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात मिरवणूक निघणार आहे. अशी माहिती सार्वजनिक जयंतीचे अध्यक्ष गुणीरत्न वाकोडे उपाध्यक्ष कर्मवीर घनसावद सचिव बलवान वाकळे, कोषाध्यक्ष लखन खिल्लारे, कार्याध्यक्ष गणेश काकडे आदींनी केले आहे.

## महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम): महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणाचा कणा

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) हा महाराष्ट्र शासनाचा एक महत्त्वपूर्ण आणि अंगीकृत उपक्रम असून, महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. २४ फेब्रुवारी १९७५ रोजी महिला सक्षमीकरणाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून या महामंडळाची स्थापना करण्यात आली. पुढे २० जानेवारी २००३ रोजी माविमला महिला विकासासाठी राज्यस्तरीय "शिखर संस्था" म्हणून मान्यता देण्यात आली. माविम केंद्र व राज्य शासनाच्या विविध महिला सक्षमीकरण योजनांची राज्यस्तरीय नोडल एजन्सी म्हणून अंमलबजावणी करते. तसेच शासन विभाग, वित्तीय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि स्वयंसहाय्य गट यांच्यात समन्वय साधून एक मजबूत दुवा म्हणून कार्य करते.माविमचे मुख्यालय मुंबई येथे असून, राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये त्याची कार्यालये कार्यरत आहेत.माविमचे ध्येय्य व उद्दिष्टे:-माविमचे मुख्य ध्येय म्हणजे निरंतर विकास प्रक्रियेद्वारे महिलांसाठी सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय प्रस्थापित करणे, हे होय. तर महत्वाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे सांगता येतील.* ग्रामीण महिलांचे संघटन करणे * महिलांच्या क्षमता विकसित करणे • आत्मविश्वास वाढविणे • उद्योजकीय विकास घडविणे • रोजगार व बाजारपेठ यांची सांगड घालणे * शिक्षण, संपत्ती व सत्तेत महिलांचा सहभाग वाढविणे • स्वयंसहाय्य बचत गटांना संस्थात्मक स्वरूप देऊन बळकट करणे माविमची कार्यपद्धती लोकसहभाग, गरजेनुसार नियोजन, लवचिक धोरणे व प्रभावी व्यवस्थापन यावर आधारित आहे. गरीबातील गरीब घटकांपर्यंत पोहोचून त्यांना सक्षम बनविणे हा या संस्थेचा केंद्रबिंदू आहे.कार्यक्षेत्र आणि प्रभावमाविम आज राज्यातील ग्रामीण व शहरी भागात व्यापक पातळीवर कार्यरत आहे:*

कार्यक्षेत्र : ३५ जिल्हे व २५९ नागरी स्थानिक संस्था (ULBs) • गावांची संख्या : १०,४९५ * स्वयंसहाय्य बचत गट (SHGs) : १,६८,३६१ * एकूण सदस्य संख्या : २०.७४ लाख • गावस्तरीय संस्था : ८,८५१ * लोकसंचालित साधन केंद्रे (CMRC) : ३६१ *

बँक कर्ज वितरण : ₹६५३९ कोटी * कर्ज परतफेड दर : ९९.५% * उद्योग/व्यवसायात गुंतलेल्या महिला : ८.७० लाख संस्था बांधणी व बळकटीकरणस्थानिक समुदायांच्या सक्षमीकरणासाठी बचत गट, ग्राम संस्था, CMRC, सूक्ष्म वित्त सेवा यांची उभारणी व बळकटीकरण, माविमंच्या सुक्ष्म उद्योग जाळ्याद्वारे केले जाते. एकमेकांना प्रेरणा देत, उभारी व सहाय्य देत हे उद्योग महिला करीत आहेत. त्यासाठी माविमं त्यांना वित्तीय पुरवठा, उत्पादन, विक्री इ.साठी लिंकेजेस पुरवते.महिला सक्षमीकरण व सामाजिक समता• कार्यात्मक साक्षरता • लिंग समानता उपक्रम • आरोग्य जागरूकता • कायदेशीर साक्षरता • राजकीय सहभाग, या नुसार उपक्रम राबवून चालना दिली जाते. त्याचा परिणाम महिलांच्या सक्षमीकरणावर दिसून आला आहे.मायक्रो-फायनान्स सेवा:- बचत, कर्ज आणि विमा सुविधा उपलब्ध करून आर्थिक स्थैर्य निर्माण करणे व जोखीम कमी करणे, यासाठी महिलांना संघटीत करणे, त्यांच्या आर्थिक साक्षरता निर्माण करुन त्यांना बँक प्रणालीशी जोडणे इ. उपक्रम राबविले जातात. त्यात माविमची यंत्रणा सहाय्य करते.उपजीविका व उद्योजकता विकास:- महिलांच्या कौशल्यांचा विकास करून त्यांना उत्पन्नाचे शाश्वत स्रोत उपलब्ध करून देणे, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे व बाजारपेठेची उपलब्धता निर्माण करणे. जीवनाशी निगडीत व जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना सहाय्य करण्यात येते.माविमचे विविध उपक्रम:- माविम विविध योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्यरत आहे. त्याद्वारे विविध उपक्रम राबवून माविम समाजातील विविध घटकांतील महिलांना एकत्र आणण्यात यशस्वी झाली आहे.• नव तेजस्विनी – महाराष्ट्र ग्रामीण महिला विकास प्रकल्प • अल्पसंख्याक महिला सक्षमीकरण कार्यक्रम (MWEP) • राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान (NULM) • महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान (MSRLM) • पाणी, स्वच्छता व आरोग्य (WASH) •SPARK प्रकल्प (अपंगत्व समावेशक ग्रामीण परिवर्तन) • स्मार्ट प्रकल्प महिलांच्या जीवनात आमुलाग्र बदल:- माविमच्या उपक्रमांमुळे महिलांच्या जीवनात सकारात्मक बदल दिसून आले आहेत:* ७९% CMRC स्वयंपूर्णपणे कार्यरत • महिलांना २ ते ३ शाश्वत उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध • १,४८,२८१ महिलांचा मायक्रो लाईव्हलीहुड योजनांमध्ये सहभाग * उत्पन्नात ₹५,००० ते ₹२०,००० पर्यंत वाढ • बँकांकडून ₹४२९५ कोटी कर्ज उपलब्ध • विविध योजनांतून ₹६३ कोटींचा लाभ * महिलांचा निर्णय प्रक्रियेत व पंचायत राज संस्थांमध्ये वाढता सहभाग * कृषी क्षेत्रात तंत्रज्ञान वापरामुळे श्रम कमी माविम हे केवळ एक महामंडळ नसून महिलांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारे प्रभावी माध्यम आहे. स्वयंसहाय्य बचत गटांच्या माध्यमातून आर्थिक स्वावलंबन, सामाजिक सक्षमीकरण आणि उद्योजकतेला चालना देत माविम महाराष्ट्रातील महिला विकासाचा मजबूत पाया उभारत आहे.


**भगवंत पाळवदे**
**-बीड**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ एप्रिल २०२६


## “नियमित वाचनातून आदर्श नागरिक घडतात” प्राचार्य डॉ. व्ही. एन. भोसले



**कन्नड (प्रतिनिधी) :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कन्नड येथील ग्रंथालयाच्या वतीने १८ तास सलग वाचन व ग्रंथप्रदर्शन उपक्रम उत्साहात संपन्न झाला. दिनांक १३ एप्रिल २०२६ रोजी आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.या निमित्ताने ग्रंथालयात डॉ. आंबेडकर यांच्या जीवन व कार्यावर आधारित निवडक ग्रंथांचे प्रदर्शन भरविण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांसाठी ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन आणि कार्य’ या विषयावर ४० गुणांची वस्तुनिष्ठ परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत सुमारे ११७ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महापुरुषांचे विचार समजून घेण्यासाठी वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. “विद्यार्थ्यांनी नियमित वाचन करून आदर्श नागरिक बनण्याचा प्रयत्न करावा,” असे आवाहन त्यांनी केले. तसेच उपप्राचार्य डॉ. मगर यांनी जयंतीनिमित्त शुभेच्छा देत विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवून अभ्यासात प्रगती साधावी, असे सांगितले. फॉर्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल क्षीरसागर यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात विद्यार्थ्यांनी नियमित वाचनाद्वारे ज्ञान अद्ययावत ठेवावे, असे मार्गदर्शन केले. या उपक्रमासाठी महाविद्यालयातील एनसीसी, एनएसएस तसेच विविध शाखांतील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. समितीतील प्रा. डॉ. प्रकाश महाजन, लेफ्टनंट डॉ. विजय मातकर प्रा. केतकी देशमुख प्रा. जितेंद्र ढोणे, प्रा. वैष्णवी मुळे, प्रा. प्रगती चव्हाण प्रा.रेणुका जाधव, प्रा.मदन खुर्दे, प्रा.अशोक भोसीकर, प्रा.अमोल सरवदे, प्रा.रामेश्वर बारगळ यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी सक्रिय सहभाग नोंदवला.या उपक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना सलग वाचनासाठी ग्रंथालयातून पुस्तके व संविधान भान या विषयावरील विशेष लेख उपलब्ध करून देण्यात आले. परीक्षेनंतर सर्वांना अल्पोपहार देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी ‘दररोज वाचन करूया’ असा संकल्प केला.या प्रसंगी सलग वाचन व ग्रंथप्रदर्शन उपक्रमाचे बोलके अनुभव कथन सहभागी विद्यार्थांनी व्यक्त केले.यानिमित्ताने संविधान जागर वस्तुनिष्ठ परीक्षा घेण्यात आली. गुणानुक्रमे परीक्षेत प्रथम, द्वितीय, तृतीय आणि तीन उत्तेजनार्थ अशा एकूण सहा विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. याचे बक्षीस वितरण मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता आयोजित केलेल्या विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथालय कर्मचारी श्री. केशव डेंगळे, श्री. गुलाब पाटील तसेच एनसीसी व एनएसएस स्वयंसेवक आणि समिती सदस्यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एस. के. भालेराव यांनी केले, तर आभार ग्रंथपाल प्रा. संतोष देशमुख व्यक्त यांनी केले.

## सामाजिक बांधिलकीतून कोळवाडी रस्त्याची स्वखर्चाने दुरुस्ती



**कन्नड (अरुण थोरात) :** वर्षानुवर्षे झालेली रस्त्याची दुरवस्था, लोकप्रतिनिधी, प्रशासनाची अनास्था यामुळे वैतागलेल्या ग्रामस्थांना दिलासा देण्यासाठी सितानाईकतांडा येथील सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पवार व मित्रमंडळी च्या वतीने कोळवाडी-सितानाईकतांडा रस्त्याची दुरुस्ती करुण आदर्श निर्माण केला आहे.लोकप्रतिनिधी, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे खराबा रस्त्यांचा तालुका अशी तालुक्याची लाजीरवाणी अवस्था झाली आहे. कोळवाडी परिसरातील रस्त्यांची ही अवस्था ही अतिशय खराब झाल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात अडचणींचा सामना करावा लागत होता. उधळलेली खडी, लहान मोठे खड्डे, पावसाळ्यात चिखल आणि उखडलेला रस्ता यामुळे वाहनचालकांसह पादचाऱ्यांना दररोज त्रास सहन करावा लागत होता. या समस्येची दखल घेत सामाजिक बांधिलकी जपत एका जागरूक नागरिकाने पुढाकार घेत स्वखर्चाने जेसीबी मशीन लावून रस्त्याची दुरुस्ती करून घेतली. यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.याबाबत परिसरातील ग्रामस्थांनी सांगितले की, प्रशासनाकडून वेळेवर दखल न घेतल्याने ही समस्या दिवसें दिवस गंभीर होत होती. मात्र, या उपक्रमामुळे रस्ता वाहतुकीस योग्य बनला असून अपघाताचा धोका कमी झाला आहे. या कार्यातून समाजासाठी पुढे येण्याचा एक आदर्श निर्माण झाला असून इतरांनीही अशा प्रकारे सामाजिक जबाबदारी स्वीकारावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.याप्रसंगी सुनील राठोड, जनार्धन राठोड व इतर मित्र मंडळ व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## महामानवाला मानवंदना

भीमाई,रामजीच्या पोटी
चौदावा रत्न जन्मा आला
शिक्षण घेऊन अफाट जगी
मानवतेचा हो उद्धार केला...१

देश विदेशात शिकून बाबा
ज्ञानाचा महासागर झाला
ज्ञानाच्या महासागराने लढा
सदा मानव मुक्तीसाठी दिला...२

मानवतेच्या मुक्तीसाठी
दिला भिमरायाने लढा
नाही वाचला लढतांना
कधी दु:खाचा हो पाढा...३

भिमरायांच्या स्वकष्टानेच
फुलविला मानवतेचा मळा
तेव्हापासून माणसाला हो
लागला माणुसकीचा लळा...४

लिहून संविधान भिमरायाने
जगण्याचा अधिकार दिला
पशुवत जीवनातून माणसाला
कायम बा भीमाने मुक्त केला..५

जातीभेद मिटवून सारे
समता प्रस्थापित केला
तेव्हापासून बहुजनांत
स्वाभिमान जागा झाला....६

महामानवाला मानवंदना
आज देऊन ऋणात राहावे
सारे मिळूनी कार्य त्यांचेच
आता पुढे पुढे चालवावे....७

**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## फ्रीज

एक नवा फ्रीज
आणला आमच्या घरी
हर्षीत झाली
घरातील मंडळी सारी

आईस्क्रीम बनविण्याची
ताईला झाली घाई
दादा तर नुसता
गार बर्फ खाई

आजोबांनी घेतली
लस्सी एक वाटी
आजीने केली जागा
लोणच्याच्या बरणीसाठी

गार पाणी पितांना
बाबांना वाटे मजा
माठाला मिळाली
कायमची रजा

दही दूध ठेवण्याची
आईला झाली घाई
पण लाईट गेल्यामुळे
सर्व वाट पाही



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ एप्रिल २०२६


## शासनाच्या भरती प्रक्रियेत सुधारणा; उमेदवारांसाठी सुलभता, तंत्रज्ञानाचा स्वीकारसंयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने १८ सेवांचा, ९३ संवर्गाचा समावेश

**बीड (भगवंत पाळवदे) :** शासनाच्या विविध पदांवरील भरती प्रक्रिया सुटसुटीत, सक्षम आणि उमेदवारांच्या दृष्टीने सुलभ व्हावी, याकरिता पदभरती प्रक्रियेत सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी देवेंद्र फडणवीस होते. या सुधारणेमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून घेण्यात येणाऱ्या विविध सेवांतर्गत संवर्गांची संख्या 102 होणार आहे. तर संयुक्त परीक्षा योजनेमध्ये नव्याने 18 सेवांचा आणि 93 संवर्गाचा समावेश होणार. तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या धर्तीवर राज्यात निपुण सेतू पोर्टल सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. विकसित महाराष्ट्र 2047 च्या व्हिजन डॉक्युमेंटनुसार हा कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. शासनाचे प्रशासन अनेक संवर्गांमध्ये विभागलेले आहे. यात 33 विभागांमध्ये, सुमारे 110आस्थापनांमध्ये 3 हजार 600 हून अधिक संवर्ग आहेत. या संरचनेत सरळसेवा भरतीसंदर्भात 1 हजार 400 हून अधिक सेवाप्रवेश नियम आहेत. यातून विविध विभागांमधून स्वतंत्रपणे तितक्याच परीक्षा घेण्यात येत होत्या. आता त्याऐवजी परीक्षांची संख्या कमी होऊन उमेदवारांसाठी भरतीच्या पदांची संख्या वाढणार आहे. त्यासाठी अधिक एकसंध, सुलभ, पारदर्शक, परिणामकारक आणि कालबद्ध निवड प्रक्रिया राबविण्यासाठी सुधारणा करण्यात येणार आहे. या सुधारणांमुळे सेवाप्रवेश नियमांमध्ये मोठे बदल होणार आहेत. याशिवाय सेवांतर्गत पदोन्नतीसाठी स्वतंत्र संवर्ग संरचना आणि मृत संवर्गांची पुनर्रचना होणार आहे.•

सेवाप्रवेश नियमांमधील व्यापक बदल- विविध संवर्गांच्या 574 सेवाप्रवेश नियमांमध्ये बदल. यामध्ये शैक्षणिक पात्रता, अनुभव, कौशल्ये आणि प्राधान्य निकषांचे सुसूत्रीकरण तसेच विविध संवर्गांतील विसंगती दूर.• अनुभवाच्या अटींचे सुसूत्रीकरण- समान स्वरूपाच्या संवर्गासाठी वेगवेगळ्या अनुभवाच्या अटी असल्याने परीक्षांची संख्या अनावश्यकरीत्या वाढत होती. त्यामुळे शैक्षणिक व अनुभव निकष अधिक सामायिक, सुसंगत आणि तर्कसंगत करण्यात येणार. यापुढे सर्वसाधारणपणे सरळसेवा भरतीसाठी अनुभवाची अट लागू राहणार नाही. • महाराष्ट्र नागरी सेवा, राजपत्रित गट-अ व गट-ब परीक्षा पद्धतीचा विस्तार- सध्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा, राजपत्रित गट-अ व गट-ब परीक्षा योजनेअंतर्गत सहा सेवांमधील एकूण 57 संवर्गांमध्ये पदभरती केली जाते. सुधारणेनंतर या सेवांमध्ये 45 संवर्गांचा नव्याने समावेश करून याअंतर्गत एकूण 102 संवर्गांचा समावेश करण्यास मान्यता.• नवीन सेवा- संयुक्त परीक्षांचे आयोजन सुसूत्रीकरण होणार. विविध प्रशासकीय विभागांतील समान संवर्गांच्या वर्गीकरणाच्या आधारे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरती केल्या जाणाऱ्या सध्याच्या सेवांव्यतिरिक्त आणखी 18 नवीन सेवा निर्माण करण्यास मान्यता. या 18 नवीन सेवांमध्ये विविध प्रशासकीय विभागांतील एकूण 93 संवर्गांचा समावेश.•गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गांचे प्रशासकीय आणि तांत्रिक गटात वर्गीकरण- गट-ब (अराजपत्रित) व गट-क संवर्गांची भरती प्रक्रिया अधिक एकसमान व कार्यक्षम करण्यासाठी त्यांचे "प्रशासकीय संवर्ग गट" आणि "तांत्रिक संवर्ग गट" असे वर्गीकरण. कर्तव्ये व जबाबदाऱ्या विचारात घेऊन प्रशासकीय स्वरूपाचे कामकाज असलेल्या 269 संवर्गांचे 18 गट, तर तांत्रिक स्वरूपाचे कामकाज असलेल्या 221 संवर्गांचे 30 गट. याकरिता स्वतंत्र भरती प्रक्रिया राबवण्यात येईल.• मुलाखतीऐवजी अंतर्गत पदोन्नती व प्रतिनियुक्ती- नामनिर्देशनाच्या कोट्यातील काही राजपत्रित संवर्गातील पदे मुलाखतीने भरण्याऐवजी अंतर्गत पदोन्नती व प्रतिनियुक्तीने भरण्यात येणार.•

कालबाह्य संवर्गांचे पुनर्गठन आणि निरसन- प्रशासकीय कामकाज आणि शासकीय व्यवहारात माहिती-तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर वाढला आहे. या पार्श्वभूमीवर काही संवर्गांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आता कालबाह्य ठरल्या आहेत. त्यामुळे प्रशासकीयदृष्ट्या अनावश्यक ठरलेल्या संवर्गांना कालबाह्य संवर्ग (Dying Cadre) म्हणून घोषित. या पदांऐवजी कृत्रिम बुद्धिमत्तेची जाण असलेली नवीन पदे निर्माण करण्याचा आवश्यकतेनुसार विचार होणार.•

अराजपत्रित संवर्गांसाठी 'नो इंटरव्ह्यू पॉलिसी'- अराजपत्रित संवर्गांसाठी मुलाखत न घेण्याचे (No Interview Policy) धोरण लागू करण्यात येईल. यामुळे निवड प्रक्रिया अधिक सुलभ,जलद आणि पारदर्शक होईल.• निवड न झालेल्या उमेदवारांसाठी "निपुण सेतू" उपक्रम- केंद्रीय लोकसेवा आयोगाने (UPSC) मुलाखत फेरीपर्यंत पात्र ठरलेल्या परंतु अंतिम गुणवत्ता यादीत स्थान न मिळालेल्या उमेदवारांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रतिभा सेतू पोर्टल सुरू केले आहे. त्याच धर्तीवर, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून अंतिम निवडीसाठी शिफारस न झालेल्या उमेदवारांची माहिती सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील संस्थांना उपलब्ध करून देण्यात येणार. त्यासाठी महाजॉब्स (MahaJobs) पोर्टलअंतर्गत "निपुण सेतू" हा उपक्रम सुरू करण्यात येणार.•

डिजिलॉकरद्वारे कागदपत्र पडताळणी - DigiLocker हे भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालयामार्फत विकसित डीजी लॉकर हे सुरक्षित डिजिटल दस्तावेज व्यासपीठ आहे. त्याचा वापर करून पदभरती प्रक्रिया सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यात येणार. यात उमेदवारांची शैक्षणिक गुणपत्रिका, अन्य स्थानांतरण, दिव्यांग, जात, क्रीडाविषयक प्रमाणपत्रे इत्यादी कागदपत्रे डिजिलॉकरद्वारे उपलब्ध करून देण्यात येतील.या सर्व सुधारणांमुळे पदभरतीसाठीच्या परीक्षांची संख्या मोठ्या प्रमाणावर कमी होईल. भरती प्रक्रिया अधिक कालबद्ध, पारदर्शक, सुलभ आणि कार्यक्षम बनेल. समान संवर्गांसाठी समान निकष, दस्तावेज पडताळणीतील सुलभता, निवड प्रक्रियेतील सुसूत्रीकरण, आणि तंत्रज्ञानाधारित प्रणालींचा वापर यामुळे शासनाची पदभरती व्यवस्था अधिक सक्षम होईल.***नगर विकास विभागकुळगांव-बदलापूर मधील मंजूर विकास आराखड्यातील चार एकर जमीन वीज उपकेंद्र उभारणीसाठी देणार कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या मंजूर विकास आराखड्यातील मौजे कात्रप येथील स्टेडियमसाठी आरक्षित जमिनीपैकी चार एकर जमीन वीज उपकेंद्र उभारणीसाठी हस्तांतरित करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. अंबरनाथ, कुळगाव-बदलापूर परिसरातील वाढते शहरीकरण आणि वाढती लोकसंख्या विचारात घेता टाटा पॉवर कंपनीस उपकेंद्र उभारण्यास उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने नवीन उपकेंद्र उभारण्यासाठी टाटा पॉवर कंपनीची शिफारस केली आहे. या ठिकाणी टाटा पॉवर कंपनी 110/22 के.व्ही.क्षमतेचे वीज उपकेंद्र उभारणार आहे. त्यानुसार मौजे कात्रप येथील स्टेडियमसाठी आरक्षित भूखंडापैकी चार एकर जागा टाटा पॉवर कंपनीस हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली. *** पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागनाबार्डकडून मच्छिमारांच्या मुलभूत सोयी सुविधांकरिता 61 कोटी 24 लाख

नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी योजनेतून सागरी जिल्ह्यातील मच्छिमारांसाठी मासळी उतरविण्याच्या मुलभूत सोयी सुविधा उभारण्यासाठी 61 कोटी 24 लाख रुपयांच्या कामांना मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या निधीतून ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, पालघर आणि रत्नागिरी येथील विविध ठिकाणी पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. सागरी जिल्ह्यांमधील मच्छिमारांसाठी मासळी उतरविण्याच्या ठिकाणी मुलभूत सोयी सुविधा नसल्याचे आढळून आले आहे. त्यासाठी नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधीअंतर्गत प्राप्त होणाऱ्या कर्जाद्वारे मासेमारीसाठी बंदरे व लहान धक्के बांधण्यात येतात. या योजनेत नाबार्डचा 95 टक्के तर राज्याचा हिस्सा 5 टक्के असा असतो. यासाठी नाबार्डकडे सादर झालेल्या प्रस्तावातील काम पूर्ण झालेल्या तसेच प्रगतीपथावरील कामांसाठी हा 61 कोटी 24 लाख रूपयांचा निधी वापरण्यात येणार आहे. यात ठाणे जिल्ह्यातील दिवाळे गाव, रायगड जिल्ह्यातील बोर्ली मांडला, दिघी, राजपूरी, नांदगाव, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील विजयदुर्ग, पालघर जिल्ह्यातील धाकटी डहाणू, रत्नागिरी जिल्ह्यातील वेलदूर यांसह पाचू बंदर, बोऱ्या आणि चिंबई यांचा समावेश आहे. या ठिकाणच्या कामांच्या अंदाजपत्रकास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली. ***कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागमुंबईत आयईएस स्कील टेक विद्यापीठ होणार

इंडियन एज्युकेशन सोसायटी या संस्थेस मुंबईत आयईएस स्कील टेक विद्यापीठ स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. हे विद्यापीठ कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठ म्हणून कार्यरत राहील. हे विद्यापीठ वांद्रे येथे शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून सुरू होईल. कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता संदर्भात सन 2015 मध्ये राष्ट्रीय धोरण जाहीर करण्यात आले आहे. या धोरणानुसार रोजगाराची संधी व पुरवठा यामधील विसंगती दूर करण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण गरजेचे असल्याचे म्हटले आहे. त्याचप्रमाणे स्कील इंडियाच्या धर्तीवर कुशल महाराष्ट्र रोजगारयुक्त महाराष्ट्र या धोरणानुसार राज्यात कौशल्य विद्यापीठाची स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच राज्यात कायम स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर खाजगी कौशल्य विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी 2021 मध्ये विनियमन व कार्यपध्दती याबाबत मार्गदर्शक सूचना निश्चित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार या विद्यापीठाची स्थापन करण्यात येणार असून या कौशल्य विद्यापीठात कौशल्य विकासाचे विविध अभ्यासक्रम शिकविले जाणार आहेत.***वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागवैद्यकीय शिक्षण, नर्सिंग, आरोग्य सेवा सशक्तीकरणासाठी जायकाकडून 3 हजार 708 कोटींची वित्तीय सहाय्यता

राज्यातील वैद्यकीय शिक्षण, नर्सिंग आणि आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सशक्तीकरण प्रकल्प राबविण्यात येणार आहे. त्यासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून (जायका) 3 हजार 708 कोटींची वित्तीय सहाय्यता घेण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्यातील जनतेला किफायतशीर दरात वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ निर्माण व्हावे, त्यांना दर्जेदार वैद्यकीय शिक्षण उपलब्ध व्हावे याकरिता राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात यापूर्वीच शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात आली आहेत. याशिवाय जळगांव, लातूर, बारामती, मिरज, कोल्हापूर, नंदूरबार व गोंदिया या सात जिल्ह्यांमध्ये 100 प्रवेश क्षमतेचे शासकीय बीएस्सी नर्सिंग विद्यालय स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या वैद्यकीय महाविद्यालय, नर्सिंग महाविद्यालय व संलग्नित रूग्णालयांच्या पायाभूत सुविधांकरिता तसेच अत्याधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध व्हावी, याकरिता "स्ट्रेन्थनिंग टर्शरी हेल्थ केअर डिलीव्हरी, मेडिकल एज्युकेशन सिस्टीम ॲण्ड नर्सिंग सिस्टीम इन महाराष्ट्र हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी जपानच्या इंटरनॅशनल को ऑपरेशन एजन्सीकडून 3 हजार 708 कोटींचे वित्तीय सहाय्य उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. त्यासाठी मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पात वर्धा, पालघर, रत्नागिरी, अहिल्यानगर या नवनिर्मित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांसाठी तसेच मुंबईतील जीटी, सेंट जॉर्ज, धुळे, सोलापूर, अंबेजोगाई, अकोला, आयजीएमसी नागपूर, रत्नागिरी, पालघर, धाराशिव येथील नर्सिंग महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करण्यात येणार आहे. तर बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर येथील नर्सिंग महाविद्यालयांचे बांधकाम करण्यात येणार आहे. याशिवाय अहिल्यानगर, भंडारा, गडचिरोली, हिंगोली, जालना, मुंबई, नाशिक, परभणी, सातारा, पालघर, रत्नागिरी, वर्धा येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी यंत्रसामुग्री उपलब्ध करून घेण्यात येणार आहे. तसेच भारत-जपान शैक्षणिक आदान प्रदान कार्यक्रमांतर्गत रूग्णालय व्यवस्थापन व प्रशासन मानवसंसाधन विकास यांच्या क्षमता वृध्दीसाठी तरतूद करण्यात येणार आहे.***नियोजन विभागआकांक्षित जिल्हा, तालुका कार्यक्रमाचा विस्तार आणखी सहा जिल्हे, 150 तालुक्यांचा समावेशआकांक्षित जिल्हा व आकांक्षित तालुका कार्यक्रमाचा विस्तार करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार या कार्यक्रमात हिंगोली, जालना, पालघर, बीड, धुळे व परभणी या सहा जिल्ह्यांचा समावेश करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. राज्याच्या प्रादेशिक संतुलित विकासाला चालना देण्याकरिता, आकांक्षित जिल्हा व तालुका कार्यक्रमाचा राज्य योजनेंतर्गत विस्तार करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात घोषणा केली आहे. त्यानुसार नीति आयोगाच्या आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत यापूर्वीच्या 4 जिल्ह्यांसह आता त्यामध्ये राज्य शासनाच्या विस्तार कार्यक्रमांतर्गत नव्याने 6 जिल्ह्यांची निवड करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर सध्याच्या 27 आकांक्षित तालुक्यांव्यतिरिक्त नवीन 150 तालुक्यांची निवड करण्यास मान्यता देण्यात आली. यामुळे या 10 जिल्ह्यातील 77 आकांक्षित तालुक्यांसह राज्यातील अन्य जिल्ह्यातील 100 आकांक्षित अशा 177 तालुक्यांमध्ये हा कार्यक्रम राबवण्यात येणार आहे. या आकांक्षित जिल्ह्यांची निवड आरोग्य आणि पोषण, शिक्षण, कृषि आणि सिंचन, कामगार, वने, ऊर्जा वापर, दारिद्य, मानवविकास निर्देशांक, ग्रामीण घनता या क्षेत्रांच्या आधारावर करण्यात आली आहे तर तालुक्यांची निवड दारिद्य निर्मूलन, पोषण, आरोग्य, शिक्षण, रस्ते, ऊर्जा या सहा क्षेत्रातील 19 निर्देशांच्या आधारे करण्यात आली आहे. या आकांक्षित जिल्हा व तालुक्यांमध्ये सामाजिक व पायाभूत सुविधांचे बळकटीकरण करण्यात येणार आहे. त्यामध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी, वीज, डिजीटल पायाभूत सुविधा, आरोग्य सुविधा व त्यांचे बळकटीकरण, शाळा, वसतिगृहे आणि उच्च शिक्षण संस्था यांच्या पायाभूत सुविधांचे बळकटीकरण यावर धोरणात्मक उपाययोजना करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा वार्षिक योजना, केंद्र व राज्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी, सीएसआर निधीचा धोरणात्मक वापर यावर भर देण्यात येणार आहे. जेणेकरून या जिल्ह्यांचा व तालुक्यांचा कायापालट करणे शक्य होणार आहे.***वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागमहाराष्ट्र वैद्यकीय परिषदेवर शासनाकडून नामनिर्देशन पध्दतीने नियुक्ती राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांची नोंदणी व नियमन करणाऱ्या महाराष्ट्र वैद्यकीय परिषद या वैधानिक संस्थेशी निगडीत अधिनियमात सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. या सुधारणेनुसार परिषदेवरील सदस्यांची नियुक्ती निवडणुकीऐवजी राज्य शासनाला नामनिर्देशन पध्दतीने करता येणार आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद राज्यातील वैद्यकीय व्यावसायिकांचे नियमन करते. वैद्यकीय व्यावसायिकांना संस्थेकडे नोंदणी करावी लागते. ही संस्था या व्यवसायातील नैतिक आचारसंहिता व वैद्यकीय शिक्षणाशी संबंधित बाबींचे पर्यवेक्षण करणारी वैधानिक संस्था आहे. या परिषदेची स्थापना महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, 1965 अंतर्गत करण्यात आली आहे. या परिषदेच्या अधिनियमात सुधारणा करण्यासाठी वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीमध्ये डॉ.आनंद बंग, डॉ.कैलाश शर्मा, डॉ.विकास महात्मे आदी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञांचा समावेश होता. या समितीने अन्य राज्यांमधील वैद्यकीय परिषदांच्या रचनेचा तसेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अधिनियम, 2019 चा अभ्यास करून अहवाल सादर केला आहे. त्यानुसार आता परिषदेवर सदस्यांची नियुक्ती निवडणुकीद्वारे न करता नामनिर्देशन पध्दतीने करता येईल, परिषदेमध्ये तज्ञ, वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील प्रतिनिधींचा संतुलित समावेश असेल, सदस्यपदाची निवड प्रक्रिया पारदर्शक व गुणवत्ता आधारित असेल अशा दुरूस्त्या अधिनियमात केल्या जाणार आहेत. तसेच परिषदेची सदस्य संख्या 18 वरून 23 इतकी होणार आहे. यामुळे परिषद अधिक कार्यक्षम, उत्तरदायी व गतिमान पध्दतीने कार्य करू शकणार आहे.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार १४ एप्रिल २०२६


## प्रिय बाबासाहेब, तुमचे गुणगान गाणारेच संविधानावर घाव घालत आहेत

प्रिय बाबासाहेब,तुमचे संपूर्ण आयुष्य आणि विचारविश्व समता, बंधुता आणि न्यायपूर्ण समाजाच्या उत्तुंग संकल्पनांनी व्यापलेले होते. परंतु, आज जेव्हा आपण केवळ संविधानाच्या निर्मितीचा सोहळा साजरा करतो आणि तुम्ही ज्या अंतिम उद्दिष्टांकडे अंगुलीनिर्देश केला होता, त्यापासून दूर जातो, तेव्हा निर्माण झालेल्या विकृतींकडे दुर्लक्ष करणे अशक्य आहे.आज तुमचे संविधान अशा वळणावर उभे आहे की ते ओळखणे कठीण झाले आहे; अनेकदा तर ते निरर्थक वाटू लागले आहे. घटनात्मक तत्त्वे आता केवळ कागदावर उरली असून, कायद्याच्या चतुर कसरतींद्वारे त्यांना सोयीनुसार वाकवले जात आहे. तुम्ही इशारा दिला होता की, संविधान कितीही चांगले असले तरी ते राबवणारे लोक जर योग्य नसतील, तर ते अपयशी ठरू शकते. आज तुमची ती भीती केवळ वैचारिक राहिलेली नाही, तर ती एक भीषण वास्तव बनून आपल्यासमोर उभी ठाकली आहे.भारताचा वर्तमान शासक वर्ग संविधानाच्या मूळ आत्म्याविरुद्ध आणि त्यातील 'मुक्तीच्या' प्रेरणेविरुद्ध पद्धतशीरपणे पावले उचलत आहे. संविधानावर जे आघात होत आहेत, त्यातून एक स्पष्ट चित्र दिसते: राजकीय स्वातंत्र्याचा पायाच नाकारला जात आहे, लोकशाही मूल्यांना दुय्यम ठरवले जात आहे आणि लोकशाही मार्गानं होणारा वैचारिक प्रतिकार हा 'गुन्हा' ठरवला जात आहे.या गंभीर परिस्थितीची तीन ठळक उदाहरणे आज आपल्यासमोर आहेत, ज्यांचा थेट संबंध संविधानाच्या अस्तित्वाशी आहे. शोकांतिका अशी की, जे लोक व्यासपीठावरून तुमचे उदोउदो करतात, तेच पडद्यामागे संविधानावर खोल जखमा करत आहेत.बाबासाहेब, तुमचे अनुयायी तुम्हाला 'एक व्यक्ती, एक मत आणि एक मूल्य' या तत्त्वाचे प्रणेते मानतात. तुमच्या मते लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नव्हती; सामाजिक लोकशाहीशिवाय राजकीय लोकशाहीला अर्थ नाही, हा तुमचा इशारा आम्ही विसरलो आहोत. आज आपण मूलभूत लोकशाही मूल्यांचीच हानी करत आहोत. जर राजकीय अवकाशच आक्रसत गेला, तर सामाजिक लोकशाहीची संकल्पना केवळ एक मृगजळ ठरेल. गेल्या काही काळात निवडणुका ही सर्वसमावेशकतेची लढाई होती, मात्र आज मतदार याद्यांतून ठराविक समुदायांना, विशेषतः अल्पसंख्याकांना पद्धतशीरपणे वगळण्याचे आरोप होत आहेत. न्यायिक प्रक्रियेचा वापर छळासाठी होणे आता सामान्य झाले आहे.संविधानाने कार्यकारी मंडळाच्या अमर्याद सत्तेवर अंकुश ठेवण्यासाठी कायदेमंडळ आणि न्यायमंडळ यांच्यात एक नाजूक संतुलन राखले होते. मात्र, आज चित्र बदलले आहे. कार्यकारी मंडळाची इच्छा हाच सर्वोच्च कायदा बनू पाहत आहे. कायदेमंडळाने प्रश्न विचारण्याचे धाडस करणे अपेक्षित होते, परंतु तेथेही बहुतांश वेळा शांतता किंवा शरणागतीच दिसते.तुम्ही अनुच्छेद 32 ला संविधानाचा 'हृदय आणि आत्मा' म्हटले होते, कारण तो सामान्य नागरिकाला सत्तेच्या अतिरेकाविरुद्ध संरक्षण देतो. परंतु आज ही सुरक्षा केवळ कागदोपत्री आणि काल्पनिक वाटू लागली आहे. 'हृदय आणि आत्मा' यावर कधीही तडजोड किंवा विलंब होऊ शकत नाही, कारण तेच संपूर्ण व्यवस्थेचे केंद्र असते. जर हेच केंद्र कमकुवत झाले, तर लोकशाही नावाचा हा डोलारा कोसळल्याशिवाय राहणार नाही.गेल्या 75 वर्षांत 'मूलभूत रचना सिद्धांता'मुळे संविधानाला एक ठोस संरक्षण लाभले होते, ज्यामुळे बहुमताच्या जोरावर होणारी मनमानी रोखली जात होती. मात्र, आज या मूलभूत रचनेचे महत्त्वच नाकारले जात आहे. तुमच्या दृष्टीने संविधान हे केवळ सत्ताधाऱ्यांच्या खेळाचे साधन नव्हते, तर ते शोषितांचे रक्षण करणारे आणि प्रगतीला दिशा देणारे जिवंत दस्तऐवज होते.जेव्हा घटनात्मक मूल्ये केवळ कागदावर राहतात, तेव्हा लोकशाहीचा गळा घोटणे सोपे होते. आणि बाबासाहेब, जेव्हा लोकशाही धोक्यात येते, तेव्हा तुम्ही ज्या 'मुक्ती'साठी आयुष्य वेचले, ती मुक्तीच आज मोठ्या संकटात सापडली आहे.

**विनीत, सुहास पळशीकर**
**अनुवाद: प्रा. प्रियदर्शन भवरे**
**साभार : इंडियन एक्सप्रेस**
**सोमवार**, 13 **एप्रिल** 2026

## वराह पालनाला आता सरकारी 'पाठबळ'! फडणवीस सरकारची योजनेला मंजुरी



**मुंबई :** राज्यातील पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेत' आता वराह पालनाचा समावेश करण्यात आला असून, यासंदर्भातील शासन निर्णय (GR) आज, 13 एप्रिल 2026 रोजी जारी करण्यात आला आहे. भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि मंत्री नितेश राणे यांनी या व्यवसायाला चालना देण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता.

शासनाने जारी केलेल्या निर्णयानुसार, वराह पालनासाठी आता कुक्कुटपालन आणि मेंढी पालनाप्रमाणेच सवलती मिळणार आहेत. सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना 50 टक्के, तर अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लाभार्थ्यांना 75 टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाईल. या व्यवसायासाठी कर्जावर 4 टक्के व्याज सवलत लागू करण्यात आली आहे. वराह पालनाचा 5+1 चा गट निश्चित करण्यात आला असून, यासाठी 2,08,187 रुपये प्रकल्प खर्च निश्चित करण्यात आला आहे.

**कोणाला मिळणार लाभ? (पात्रता आणि निकष)**

या योजनेचा लाभ प्रामुख्याने ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना मिळणार आहे. यामध्ये खालील क्रमाने प्राधान्य दिले जाईल:

१.भूमीहीन आणि दारिद्रय रेषेखालील व्यक्ती.

२.अत्यल्प भूधारक (1 हेक्टरपर्यंत) आणि अल्प भूधारक (1 ते 2 हेक्टरपर्यंत).

३.सुशिक्षित बेरोजगार आणि वनहक्क धारक.

४.महिला बचत गट.

**विशेष आरक्षण:** या योजनेत 50 टक्के जागा महिलांसाठी आणि 5 टक्के जागा दिव्यांगांसाठी आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

**निवडीसाठी अटी व शर्ती**

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांकडे खालील गोष्टी असणे अनिवार्य आहे:

•**प्रशिक्षण:** पशुपालन व्यवसायाचे शासकीय किंवा निमशासकीय संस्थेचे प्रशिक्षण प्रमाणपत्र आवश्यक. (प्रमाणपत्र नसल्यास लाभ घेण्यापूर्वी प्रशिक्षण घेण्याचे हमीपत्र द्यावे लागेल).

•**जागा:** वराहांच्या शेडसाठी स्वतःची जागा उपलब्ध असणे आवश्यक असून, वराह मोकाट सोडले जाणार नाहीत, असे स्वयंघोषणा पत्र द्यावे लागेल.

•**अनुभव:** प्रशिक्षण नसेल तर स्थानिक पशुवैद्यकीय अधिकाऱ्याचे 2 वर्षांचे अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल.

